सामान्य प्रशासन विभाग, जि.प.सोलापूर
जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१२/अकंपा/ ८६ /२०२०
सोलापूर दिनांक - १५ /०२/२०२०

प्रति,

---------------------------------------
---------------------------------------
---------------------------------------

विषय:- अनुकंपा भरती प्रक्रियेकरीता कागदपत्रांच्या पडताळणीसाठी दिनांक- २५.०२.२०२० रोजी आयोजीत केलेल्या कॅम्पला उपस्थित राहणे बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, **गट-क संवर्गासाठी किमान १० वी उत्तीर्ण व त्यापुढील शैक्षणीक आर्हता प्राप्त असणाऱ्या उमेदवारांच्या** अनुकंपा भरती प्रक्रियेकरीता कागदपत्रांच्या पडताळणीसाठी **दिनांक-२५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद सोलापूर येथे** कॅम्प आयोजीत करण्यात आलेली आहे.

सदर कॅम्पमध्ये १) कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर एका वर्षाचे आत अनुकंपा नोकरीसाठी केलेले अर्ज, २) सज्ञान झालेनंतर एका वर्षाचे आत अनुकंपा नोकरीसाठी केलेले प्रथम अर्ज, ३) विहित नमुना अर्ज, ४) कुटूंबातील वारसांचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञालेख), ५) अनुकंपा नोकरी देणेसाठी कुटूंबातील अन्य वारसांचे संमतीपत्र (प्रतिज्ञालेख), ६) कुटूंबातील कोणतेही सदस्य शासकीय / निमशासकीय सेवेत नसल्याचे प्रतिज्ञालेख, ७) कर्मचाऱ्याच्या पत्नीचा अनुकंपासाठी अर्ज असल्यास पुनर्विवाह न केलेचा प्रतिज्ञालेख, ८) शैक्षणीक आर्हतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक, ९) जन्म तारखेसंबंधीत कागदपत्र, १०) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, ११) कर्मचाऱ्यांच्या मृत्युपश्चात कुटुंब निवृत्ती वेतन व मिळालेल्या इतर लाभांचे आदेश, १२) कर्मचाऱ्याचा मृत्यु दाखला इ.कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे.

तेंव्हा आपण उपरोक्त मूळ कागदपत्रांसह दिनांक २५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद सोलापूर येथे न चुकता उपस्थित रहावे. सदर दिवशी आपण उपस्थित न राहिल्यास आपल्या अनुकंपा नियुक्तीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(परमेश्वर राऊत)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशा.)
जिल्हा परिषद, सोलापूर